# राज्यसेवा परीक्षा व्यूहरचना

## ➢ परीक्षेच्या प्रत्येक टप्प्यावर अभ्यासाची कोणती व्यूहरचना असावी ?

राज्यसेवा परीक्षेमध्ये अंतिम यश प्राप्त करण्यासाठी परीक्षेच्या तीनही टप्प्यांवर एक नवीन दृष्टिकोन अमलात आणणे गरजेचे असते.

### पूर्व परीक्षा व्यूहरचना :-

- मागील वर्षीच्या प्रश्नपत्रिकांचे खोलवर विश्लेषण करून त्यातील प्रश्नांचा संबंध अभ्यासक्रमातील घटकांशी निश्चित करून अभ्यासाचा योग्य तो दृष्टिकोन प्राप्त करणे.
- मुलभूत अंकगणित, बुद्धिमत्ता व तर्क अनुमान या विषयांचा नियमितपणे अभ्यास
- चालू घडामोडींचा नियमित अभ्यास
- गुणवत्तापुर्ण अभ्याससाहित्य आणि मार्गदर्शकाची निवड
- प्रश्नपत्रिका सोडविण्याचा भरपूर सराव

### मुख्य परीक्षा व्यूहरचना :-

- मागील वर्षीच्या प्रश्नपत्रिकांचे खोलवर विश्लेषण करून त्यातील प्रश्नांचा संबंध अभ्यासक्रमातील घटकांशी निश्चित करून अभ्यासाचा योग्य तो दृष्टिकोन प्राप्त करणे
- गुणवत्तापुर्ण अभ्याससाहित्य आणि मार्गदर्शनाची निवड .
- मराठी आणि इंग्रजी विषयातील निबंध आणि भाषांतर या घटकांचा नियमित सराव तसेच सारांशलेखन, व्याकरण, पत्रलेखन यांच्या लिखाणाचा सराव.
- चालू घडामोडींचा अभ्यासक्रमाशी योग्य तो मेळ घालून अभ्यासक्रमातील घटकांचे सखोल वाचन व उजळणी
- प्रश्नपत्रिका सोडविण्याचा भरपूर सराव
- निकोप स्पर्धा आणि नियमितपणे आत्मपरीक्षण.

### मुलाखतीची तयारी :-

- मुलाखत चाचणी ही उमेदवाराच्या व्यक्तीमत्वाची चाचणी असते. व्यक्तीमत्व विकासासाठी अभ्यासाच्या प्रारंभापासुनच शारिरिक व मानसिक स्वास्थ्य संतुलित ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न
- सभोवताली घडणाऱ्या घटनांकडे विश्लेषणात्मक दृष्टिने पाहण्याची क्षमता वाढविणे.
- आत्मविश्वास आणि संयम बाळगणे.

## ➢ अभ्यासाची सुरवात केव्हा करावी ? (पुढच्या वर्षीच्या पूर्व परीक्षेसाठी आणि त्यापाठोपाठ येणाऱ्या मुख्य परीक्षेसाठी)

- परीक्षेच्या अगोदर एक वर्ष अभ्यासाची सुरवात करावी. अर्थात जूनपासून जर अगदीच शक्य नसेल तर मात्र निदान ऑक्टोबरपासून तरी सुरुवात करायलाच हवी.
- तुम्ही पदवी प्राप्त केल्यानंतर लगेच अभ्यासाला लागणार असाल तर हे शक्य आहे. परंतु, सुरुवात मात्र मे/जूनमध्येच करावी. सुरुवात करण्यासाठी अजिबात वेळ दवडू नका. कारण तुम्हाला नंतर वेळेचा तुटवडा निर्माण होऊ शकतो.
- जर तुम्ही पदवी शिक्षण घेत असतानाच तयारी करणार असाल तर सर्वसाधारण व्यूहनीती सांगता येणार नाही. त्यामुळे तुमच्या अभ्यासाची व्यूहनीती ठरविण्यासाठी वैयक्तिकरित्या आम्हाला भेटा.

## ➢ MPSC च्या विविध परीक्षेची तयारी कशी करावी ?

- जर तुम्ही सिनर्जीशी जोडले गेला असाल तर बॅचची निर्धारीत व्यूहरचना पाळा. तुम्ही तुमच्या ध्येयापर्यंत पोहोचाल.
- जर तुम्ही स्वत:च तयारी करणार असाल तर खालील पायऱ्यांनी सुरवात करा.
  - जुन्या प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण
  - अभ्यासक्रमाचे आकलन
  - दर्जेदार अभ्यास साहित्याचे सखोल वाचन
  - प्रश्नपत्रिका सोडवून आत्मपरीक्षण

- **सर्व तांत्रिक बाबींची माहिती कोठे मिळेल ?**

  यासाठी www.mpsc.gov.in / www.synergympsc.com या संकेतस्थळाला भेट द्यावी.

- **MPSC आणि UPSC या दोन्ही परीक्षांचा एकत्रित अभ्यास करता येतो का ?**

  होय. सन २०१२ सालापासून झालेल्या MPSC च्या परीक्षेचे स्वरुप पाहिल्यास या परीक्षांची काठिण्यपातळी UPSC च्या परीक्षांच्या जवळ जात असल्याचे दिसते. तसेच पूर्व परीक्षेचा अभ्यासक्रमही सारखा असल्यामुळे दोन्ही परीक्षांचा एकत्रित अभ्यास करणे निश्चितच शक्य आहे.

  **MPSC व UPSC च्या परीक्षेतील साम्य :–**

  - पूर्व परीक्षेचे स्वरुप आणि अभ्यासक्रम सारखाच
  - मुख्य परीक्षेतील UPSC च्या अभ्यासक्रमातील काही भाग MPSC च्या मुख्य परीक्षेसाठी निर्धारित केला आहे.
  - मुलाखतीचे स्वरुप दोन्ही परीक्षांसाठी सारखेच आहे.
  - गेल्या तीन वर्षात राज्यसेवेचे बहुतांशी टॉपर्स यूपीएससीचा अभ्यास करताना दिसतात. त्यामुळे परीक्षेचा अभ्यास करताना यूपीएससीची व्यापकता व खोली येणे आवश्यक आहे.

  **MPSC व UPSC च्या परीक्षेतील फरक :–**

  - MPSC च्या मुख्य परीक्षेमध्ये मराठी व इंग्रजी हे विषय अनिवार्य आहेत आणि त्यांचे गुण अंतिम निवडीसाठी विचारात घेतले जातात. तर UPSC च्या परीक्षेमध्ये इंग्रजी व प्रादेशिक भाषा (मराठी) हे पेपर केवळ किमान भाषाज्ञान तपासण्याच्या उद्देशाने घेतले जातात. त्यांचे गुण अंतिम निवडीसाठी विचारात घेतले जात नाहीत.
  - MPSC चे सामान्य ज्ञानाचे चारही पेपर वस्तुनिष्ठ स्वरुपाचे असतात तर UPSC चे सामान्य ज्ञानाचे पेपर विश्लेषणात्मक लेखी स्वरुपाचे असतात.
  - MPSC मध्ये वैकल्पिक विषय निवडावा लागत नाही. मात्र, UPSC मध्ये वैकल्पिक विषयाची निवड करावी लागते.

- **राज्यसेवा पूर्व व मुख्य परीक्षेचे विश्लेषण :–**

  - मुख्य परीक्षा २०१२, २०१३ मध्ये बऱ्याच विद्यार्थ्यांचे एकूण गुण चांगले असले तरी एखाद्या विषयात ते अयशस्वी झालेले दिसतात. म्हणजेच सर्वच विषयांचा सखोल अभ्यास करणे अपेक्षित आहे.
  - २०१४ चा अंतिम निकाल पाहिल्यास ज्या उमेदवारांनी अंतिम यादीत स्थान निश्चित केले आहे अशा उमेदवारांना मराठी व इंग्रजी या विषयात सर्वसाधारणपणे एकूण ११० पेक्षा अधिक गुण प्राप्त झाल्याचे दिसून येते. यावरून भाषा विषयांकडे विद्यार्थ्यांनी सुरवातीपासुनच लक्ष देणे अपेक्षित असल्याचे स्पष्ट होते.
  - राज्यसेवेचे बहुतांशी विद्यार्थी अभ्यासक्रमाकडे दुर्लक्ष करुन केवळ बाजारु पुस्तकांवरच भर देताना दिसतात. सन २०११ पर्यंत योग्य असलेली ही व्यूहरचना आता मात्र कालबाह्य झाली आहे. आता बाजारु गाईड्स आणि नोट्स यापेक्षा संदर्भ पुस्तके मुळातूनच वाचणे गरजेचे आहे. त्याबरोबरच वर्तमानपत्रे व इंटरनेटच्या साहाय्याने अभ्यास अपडेट करणे अनिवार्य ठरत आहे.
  - पूर्व परीक्षा सन २०१३, २०१४, २०१५ मध्ये ॲप्टीट्यूड पेपरचे महत्व सर्वांनाच कळून चुकले आहे. या पेपरची काठिण्यपातळी यूपीएससीपेक्षा ही अधिक होती. पूर्व परीक्षा पास होण्यासाठी या पेपरकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही. खरेतर त्यामध्ये पूर्ण नैपुण्य मिळविणेच गरजेचे आहे.